Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
OneTime Serial Rights

# चक्र

राधेच्या वडलांची कोल्हापूरजवळच्या एका खेड्यात, रामपुरात शेती होती. मुलांना लिहिता-वाचता येईपर्यंत शिकवायचं आणि शेतीला लावायचं, मुलींना त्यांचा कल असलाच तर शाळेत पाठवायचं. नाही तर घरीच ठेवायचं व चौदा - पंधरा वर्षांच्या झाल्या की, त्याचं लग्न करायचं, असं त्याचं धोरणं होतं.

राधा त्यांची सर्वात धाकटी मुलगी. दिसायला उजवी ! राधा शाळेतही हुशार निघाली. तशा खेड्यातल्या शाळेत जाऊनही ती घरातल्या सर्वांपेक्षा उत्तमरित्या लिहू, वाचू लागली.

राधाच्या वडलांची एक धाकटी बहीण, लक्ष्मी पुण्याला दिली होती. तिचं सासरही खेड्यातलंच होतं, पण तिच्या नवऱ्याने लग्नानंतर आपलं खेडं सोडून पुण्याला बिऱ्हाड हलवलं होतं.

लक्ष्मीला मुलबाळ नव्हतं. राधा तिची लाडकी होती. ती राधाला पुण्याहून पुस्तकं व मासिकं पाठवायची. घरातल्या बायकांना पुण्याहून आलेल्या पुस्तकातल्या गोष्टी आवडत असत, पण त्यांना वाचता येत नव्हतं. म्हणून त्या राधाला गोष्टी वाचायला सांगत. राधा घडाघडा सर्व वाचून दाखवत असे. सर्व घरात असं वाचायला कुणालाच येत नव्हतं.

सातवीत गावातली शाळा संपली. गावातल्या काही कुटुंबांनी आपल्या मुलांना तालुक्याला शिक्षणाला पाठवलं. राधा आता घरी बसणार हे क्रमप्राप्तच होतं.

राधाची शाळा संपल्यावर उन्हाळ्यात लक्ष्मी भावाकडे पुण्याला आली होती. तिने राधाला घडाघडा वाचताना ऎकलं आणि ‘राधाला मी घेऊन जाते. तिला पुण्याच्या शाळेत घालू या.’ अशी लक्ष्मी भावाची व वाहिनीची विनवणी करू लागली. ‘तुझी पोरगी हुशार आहे. पुण्याच्या शाळेत शिकेल.’ वगैरे म्हणू लागली. राधा पुण्याला जायच्या कल्पनेने हुरळली व आईवडिलांच्या मागे ‘पुण्याला जाते’ म्हणून लागली.

पण राधाची आई तयार नव्हती. ‘पोरगी जास्त शिकली तर नवरा कसा मिळणार? मुलगे आहेतच कुठे शिकलेले आपल्या जातीत? शिवाय एकदा पुण्याला राहिल्यावर राधाला खेड्यात राहायला आवडणार नाही. तिचं लग्नानंतर कसं होणार? ती शेतीची कामं कशी करणार?’ वगैरे अनेक काळज्या राधाच्या आईमागे होत्या. शेवटी हो ना करता राधाला वर्षासाठी पुण्याला पाठवून बघायचं ठरलं.

प्रथमच पुण्याच्या शाळेत गेल्यावर राधा बिचकली, पण हळूहळू तिने शहरी सवयी आत्मसात केल्या आणि पहिला नंबर सोडला नाही.

शाळेतल्या समारंभात राधाला नाटकात घेतलं होतं. तिचं काम पहायला रामपुरातून तिचे आईवडिल आले होते. राधाला मिळालेली बक्षिसं व नाटकातलं काम पाहून दोघंही अभिमानाने फुलून आले. पुण्याच्या शाळेत

आपल्या मुलांपैकी कुणाचा गौरव होऊ शकेल, हे आजवर त्यांच्या स्वप्नातही आलं नव्हतं. बरोबरच राधा बदलली हे आईच्या लक्षात आलं. तिच्या वागण्या - बोलण्यात शहरी सफाई होती. कपडे आधुनिक झाले होते. एवढंच नव्हे तर तिला इंग्लिशही थोडंफार वाचता येऊ लागलं होतं. राधाच्या भविष्याविषयीची आईची काळजी दुणावली. ह्या हिरकणीला शोभेसा हिरा कुठे शोधायचा? त्यांच्या जातीत राधाच्या तोलाचा मुलगा कसा मिळणार, हेच तिला समजेना.

'लक्ष्मी, डोळे उघडे ठेव. पुण्याला आपल्या जातीतले मुलगे असतील शाळा - कॉलेजात जाणारे.' तिने नणंदेला सांगितलं.

राधाच्या आईच्या लक्षात आलं नाही की, राधा वरवर बदललीय. तिचं गावातल्या आपल्या घरावरचं आणि गावावरचं प्रेम अबाधित आहे. पुण्याला सरावली तरी राधा आपल्या गावाला जायला आतुर असायची. ते दगडी घर, पाठीमागची विहीर, परसातला मोठ्ठा पिंपळ, पुढच्या दारचे सायली अन् मोगरीचे वेल, गोठ्यातले बैल, गायी अन् म्हशी, गावाबाहेरची शेतं, गावाच्या सारहद्दिवरचं मारुतीचं देऊळ, सगळ्यावरच तिचं अपार प्रेम होतं.

राधा नववी पास झाल्यावर आई विलक्षण अस्वस्थ झाली. आता राधाला घरीच राहू दे, असं तिच्या वडलांना म्हणू लागली. राधा सुट्टीत घरीच असताना लक्ष्मीचं पत्र आलं. तिच्या पुण्याला कॉलेजात असणाऱ्या एका शेतकऱ्याच्या मुलाविषयी माहिती कळली होती. 'मुलगा गणेश आपल्याच जातीचा अहे. वडलांची मोठी शेती आहे. बाकी सर्व भाऊ शेतीच चालवतात. हाच तेवढा कॉलेजात आहे.' इत्यादि माहिती व मुलाच्या आई - वडलांचं नाव व पत्ता तिने लिहिला होता.

राधाचे वडील ताबडतोब गणेशच्या वडलांना भेटायला गेले. त्यांचं उत्तम स्वागत झालं. ओसरीवर बसून सुपारी कातरत मुलाचे वडील म्हणाले, 'आमचा गणेश विचित्र आहे. त्याला साधीसुधी मुलगी चालणार नाही म्हणतोय. त्याला शिकलेली मुलगी हवी.'

'माझी मुलगी शिकलेली आहे. शिकते आहे. आणखी सुद्धा शिकेल.' राधाचे बाबा सावधपणे म्हणाले.

'त्याचं हे खूळ आम्हाला पसंत नाही. शिकलेली मुलगी सासूच्या हाताखाली कशी राहिल?' गणेशचे बाबा पुढे सांगू लागले.

'पण मुलगा ऐकतच नाही.'

'माझी मुलगी आनंदाने सासूच्या हाताखाली राहिल.' राधाच्या बाबांनी म्हटलं.

'तो प्रश्नच उद्भवणार नाही म्हणा! गणेश पुण्यालाच राहायचं म्हणतोय.'

मग मुलगी सासू - सासऱ्यांना दाखवण्याचा कार्यक्रम झाला. मुलाने पुण्याहून येउन मुलगी बघितली. मुलगी सर्वांना पसंत पडली. मुलगाही राधाच्या आई- वडलांना पसंत पडला. तो इंजिनियरिंगच्या पहिल्या वर्षाला शिकत होता. आणखी दोन वर्षे शिक्षण संपेपर्यंत लग्न करणार नाही आणि राधानेही शिकत राहिलं पाहिजे, अशा दोन विचित्र अटी त्याने घातल्या, 'मला खरी सहधर्मचारिणी हवी आहे. मी काय करतोय ते समजून घेण्याची कुवत असणारी. घरकाम करणारी व मुलांना सांभाळणारी दाई नको.' असं काही तो राधाच्या व स्वतःच्या वडलांना म्हणाला.

हे सर्व खूळ दोन्हीकडच्या आई - बापांना पसंत नव्हतं. त्यांना लग्न करून टाकायचं होतं. राधा राहील माहेरी किंवा सासरी असं त्यांचं म्हणणं होतं, पण गणेश बधला नाही. नाईलाजाने सासू - सासरे व आई - वडील कबूल झाले. मग इतर बोलणी झाली. वरपक्ष मुलाच्या विचित्र मागण्यांमुळे नरमाईने घेत होता. तेव्हा सगळं देण्याघेण्याचं सहज ठरलं. राधाची रवानगी परत उन्हाळ्याचा सुट्टीनंतर पुण्याला झाली.

एवढंच की ह्या सर्व बाबतीत राधाचं मत कुणी विचारलं नाही, 'तुला पुण्याला कायम रहायचं आहे का?' 'तुला नवरा पसंत आहे का?' असं तिला विचारावं असं कुणाच्या मनातही आलं नाही. तशी पद्धतच नव्हती मुळी.

राधालाही आपली संमती कुणी विचारेल, अशी अपेक्षा नव्हती. तेव्हा तिने आईवडलांनी ठरविलेल्या लग्नाला मान्यता दिली, पण तिच्या मनात खोल कुठेतरी काटा सलला. तिला कायम पुण्याला राहायचं नव्हतं. तिला राहायचं होतं खेड्यात - तिच्या रामपुर सारख्याच दुसऱ्या कुठल्या तरी खेड्यात. त्या सलणाऱ्या काट्याकडे तिने दुर्लक्ष केलं. तिच्या हातात तिचं भविष्य नव्हतंच.

हळूहळू तिची गणेशशी ओळख झाली आणि सलणाऱ्या काट्याची तीव्रत कमी झाली. मनमोकळ्या, हुशार, उंच, रांगड्या गणेशच्या ती प्रेमात पडली.

दोन वर्षांनी शाळा संपल्यावर गणेश व राधाचं लग्न झालं. गणेशने जागा घेऊन ठेवलीच होती. त्याची आई नको नको म्हणत असताना तो राधाला लगेच परत पुण्याला घेऊन आला आणि तिला कॉलेजात दाखल केली.

'तुला चांगलं इंग्लिश बोलत आलं पाहिजे. अखेर आपल्याला अमेरिकेला जायचंय.' असं तो तिला म्हणाला. राधाने ते हसण्यावारी नेलं.

राधाचा संसार सुरु झाला. तिला स्वैंपाक करून कॉलेजला जावं लागत होतं. तेही ती सहज करत होती.

दर चार - सहा महिन्यांनी तिला खेड्याची विलक्षण ओढ लागायची. काहीतरी निमित्त काढून ती माहेरी किंवा सासरी जाउन येत असे. गणेश बरोबर आला तर ठीक, नाही तर एकटीच जायची. तिथली विहीर, चरणारी गुरं, शेती, मोकळी हवा हे सर्व वातावरण तिला संजीवनीसारखं वाटत असे.

तिथे काही दिवस राहिल्यावर पुन्हा सचेतन होऊन ती परत शहरात जायची.

तिच्या एवढंच आपल्या खेड्यावर, शेतावर प्रेम असलेली आणखी एक व्यक्ती तिच्या सासरी होती. ती म्हणजे तिचे सासरे दलपतराव. सासरची सर्व माणसं राधापुढे थोडी दाबूनच असत. कारण तिचं शिक्षण आणि शहरी वळण, पण सासऱ्यांनी तिचं अंतःकरण ओळखलं.

'खेड्यातच रहावसं वाटतं का तुला सुनबाई?' त्यांनी एकदा राधाला विचारलं. उत्तरादाखल राधा हसली आणि तिने मान डोलावली.

'ह्या मातीचं प्रेम रक्तातच असतं आणि शहरात वर्षानुवर्षे राहिलं तरी ते नाहीसं होत नाही. तुझ्या नवऱ्याच्या रक्तातच नाही ते.' सासरे म्हणाले.

स्वतःच्या हृदयात वाहणारा शेतीवाडीच्या प्रेमाचा झरा आणि गणेशची शेतीवाडीविषयीची उदासीनता राधाला सासऱ्यांचं म्हणणं सत्य आहे, हे पटवून देऊन गेली.

पुढच्या दोन वर्षात गणेशचा धाकटा भाऊ रंगा शेती सांभाळू लागला. धाकटा भाऊ जनुपण शाळा सोडून शेतावर कामाला लागला.

हळूहळू राधाने आपण कधीतरी परत गावात कायम राहायला जाऊ, ही आशा सोडून दिली. रिटायर झाल्यावर कदाचित जायला मिळेल असं तिने स्वतःला समजावलं.

एव्हाना गणेशने अमेरिकेतील काही युनिव्हर्सिटीत मास्टर्स डिग्रीसाठी अर्ज केले होते. त्याला दोन ठिकाणी फेलोशिपही मिळाली व त्याने अमेरिकेला जायचे ठरवल… राधाने बरोबर जावं की नाही, याबद्दल सासरी व माहेरी बरीच चर्चा झाली. कही झालं तरी राधाने गणेश बरोबर जावं, असं राधाच्या आईचं मत होतं. मुलगा एकटा परदेशात. त्याला तिथल्या बायकांचा मोह पडला आणि तो परत आलाच नाही, तर राधाचं काय होईल, ह्याची तिला काळजी होती. राधाच्या सासूचं उलट मत होतं. 'राधाला इकडे ठेवली की गणेश नक्की परत येईल.' असंच काहीतरी ती म्हणत होती.

पण गणेशने कुणाकडेच फार लक्षं दिलं नाही. त्याचा निश्र्चय झाला होता. तो राधाला घेऊनच अमेरिकेत जाण्यास निघाला. विमानात पाय ठेवताच त्याने राधाला आपला जमल्यास अमेरिकेत स्थायिक होण्यास बेत बोलून दाखविला.

ज्या देशात अजून पायाही ठेवला नाही तिथे कायम राहण्याचा बेत आपला नवरा कसा करू शकतो, हेच राधाला समजलं नाही. तिलाही अमेरिका पाहण्याची फार उत्सुकता होती. ती अमेरिकेला जाणार हे कळताच तिच्या मैत्रिणींनी व ओळखीच्या लोकांनी तिचं असुयमिश्रित अभिनंदन केलं होतं. त्यामुळे 'अमेरिका पाहायला मिळतेय हे आपलं भाग्याच.' असं राधाला वाटत होतं आणि म्हणून ती खूप आनंदात होती. 'अमेरिकेत कायम राहायचं' हा विचारही तिच्या मनात आला नव्हता. गणेशचा अमेरिकेत स्थायिक होण्याचा विचार ऐकून राधाच्या आनंदाला ओहोटी लागली. तिचे डोळे भरून आले आणि मन अगदी उदास झालं.

गणेशशी वाद घालावा अशी तिला इच्छा झाली. 'सगळ्या आपल्या माणसांना आणि शेतीवाडीला सोडून कायमचं दूर राहायचं?' असं ती म्हणालीही. गणेशने त्यावर तिला एक मोठं व्याख्यान ऐकवलं.

'राहुल आणि जयंत अमेरिकेला गेलेत दोन वर्षांपूर्वी. आठवतंय का?' त्याने राधाला विचारलं.

राधाच्या डोळ्यासमोर जयंत आणि राहुल उभे राहिले. त्यांना अमेरिकेला जाण्यापूर्वी दिलेली पार्टी आठवली. त्या पार्टीत अमरिका म्हणजे स्वर्ग असं चित्रं ती दोघे रंगवत होते.

'चैनीची राहणी, कार, मोठी घरं, स्वस्ताई, मुबलक वस्तू शिवाय शास्त्रीय संशोधनाला वाव' इ. इ. राधाने तटस्थपणे 'अमेरिकेला का जायचं.' ह्याचं विश्लेषण ऐकलं होतं.

त्यानंतर जयंत व राहुलची अमेरिकेहून आलेली पत्रे एवढी भडक नव्हती. पार्टीत रंगवलेल्या चित्रापेक्षा पत्र जास्त वास्तववादी असावीत, असं राधाला वाटलं होतं. कारण पत्रात कार, घर, समृद्धी इत्यादीचं वर्णन होतं, पण बरोबर नोकरीत करावं लागणारं काम, रोजची धावपळ, स्वावलंबन ह्यांचा पण उल्लेख होता.

राधा विचारात गढलेली पाहून गणेश म्हणाला, 'हे बघ राधा, तुझ्या डोक्यात काय चाललंय ते मला बरोबर समजतंय. अमेरिकेतल्या चैनीची मला ओढ नाहीये. मला आणखी शिकायचं व संशोधन करायचं. भारतीय एकेकाळी धाडसी होते. नंतर त्यांनी धाडस वृत्ती सोडली. रूढी - धर्माच्या बंधनात स्वतःला बांधून घेतलं. आपल्या कूपमंडूक वृत्तीमुळे आपण जगात मागासलेले, समजलो जातो. आपल्याला देशाबाहेर पडायला हवं. संशोधनाला खरा वाव अमेरिकेत आहे. तिथे राहून जमलं तर भारतासाठी आपण काही करू, पण ते जमलं नाही तर माझी स्वतःची

तरी उन्नती होईल. हे ब्रेन ड्रेन म्हणतात ते काही खरं नाही. मी भारतातून निघालो तर माझी जागा घ्यायला अनेक इतर भारतीय इंजिनियर आहेत. आपल्या फ़्लाटसाठीच किती माणसं आली चौकशीला ?'

गणेश बोलतच राहिला. राधाने वाद वाढवला नाही. तिचं मन म्हणत होतं, 'देशाचं देणं तू या न त्या मार्गाने देशील गणेश ! एवढ्या उच्च पातळीवर मी विचार करतच नाहीये. मी विचार करतेय आई - वडिलांच्या, सासूसासऱ्यांच्या आणि इतर नातेवैकांच्या मुकलेल्या सहवासाचा ! शेतीवाडीपासून सतत दूर राहिल्याने होणाऱ्या माझ्या जीवाच्या तळमळीचा !'

अमेरिकेला आल्यावर गणेशने आपल्याबरोबर राधालाही एका कॉलेजात ॲडमिशन मिळवून दिली. ती दोघंही शिकू लागली. राधाला घरची खूप आठवण येत असे. पुण्याहून ती चार - पाच महिन्याने गावी जायची. आता त्या अल्पकाळच्या भेटीची संजीवनी तिला मिळेनाशी झाली. मातृभूमीच्या भेटीसाठी ती आससून जात असे.

ती काही म्हणाली की गणेश रागवायचा 'जसं काही तुझंच प्रेम आहे सगळ्यांवर ? माझं नातं नाहीच वाटतं कुणाशी ? हे बघ, देव व्हायचं असेल, तर टाकीचे घाव सोसावे लागतात. शिक्षणासाठी हे सगळं सहन करायला हवंय मला आणि माझी पत्नी म्हणून तुला !'

राधाचा दोन वर्षांसाठी अमेरिकेत राहायला विरोध नव्हता. तिला गणेश कायम अमेरिकेत राहील, ही काळजी जाळत होती. एक दोनदा तिनं तसं बोलून दाखवलं. तेव्हा गणेश तिला म्हणाला -

'हे बघ राधा मी सध्या स्टुडंट विझावर आहे. भविष्य कुणी पाहिलंय ? आपण कायम इथे राहू ही नसती काळजी तू कशाला करतेस ? कदाचित मला राहता येईल, कदाचित राहता येणार नाही. काय करायचं ते दोन वर्षांनी ठरवू ! तू उगीच काळजी करू नकोस. सध्या आपण अमेरिकेत आहोत, तर मजा करून घेऊ.'

एरवी जोरदारपणे तिला आपली मतं सांगणाऱ्या गणेशच्या हळूवारपणाचं राधाला थोडं आश्चर्य वाटलं. बहुतेक आपल्याला दोन महिने गेले आहेत म्हणून गणेश हळुवारपणे वागत असेल, अशी राधाला शंका आली.

हळूहळू राधा अमेरिकेला सरावली. तिचा अभ्यास, घरकाम ह्यात तिला इतर परिस्थितीचा विचार करायला वेळच मिळत नसे. तिच्या बाळंतपणाच्या वेळी तिची आई भारताहून आली. राधाला मुलगा झाला. समीरला राधा व गणेशने सासू - सासऱ्यांच्या व आईवडलांच्या इच्छेला मान देऊन भारतात आजी - आजोबांकडे ठेवायचं ठरवलं. राधाची आई समीरला घेऊन भारतात जायला निघाली तेव्हा राधाला चिमुकला समीर भारतात चालला म्हणून वाईट वाटत होतं. परंतु तिच्या मनात खोल कुठेतरी समीर भारतात विशेषतः तिच्या सासर व माहेरच्या खेडेगावात शेतीवाडीवर वाढणार, ह्याबद्दल सुप्त आनंद आणि समाधान होतं.

गणेशचं शिक्षण संपलं. त्याने अनुभवासाठी म्हणून नोकरी धारली. राधाने दोन वर्षं कॉलेजात इंग्लिश, सोशल सायन्स वगैरेचा अभ्यास करून हॉल्टिकल्चरच्या (Horticulture) डिप्लोमाला जाण्याचं ठरवलं. त्यामुळे जरी प्रत्यक्ष शेतीवरची कामं केली नाहीत, तरी राधाच्या आवडीचं ते काम होतं. माती, फुलंफळं, भाज्या यांच्याशी तिचा संबंध होता. 'देवाने माती निर्माण केली ती सगळीकडे एकच केली आहे. भारत, अमेरिका हे नकाशे देवाने काढले नाहीत. भारतातल्या शेतीत काम करायला नाही मिळालं म्हणून काय झालं ? मी इथल्या मातीतून फळं - फूलं निर्माण करीन.' राधाने दुधाची तहान ताकावर भागावण्याचं ठरवलं.

आणखी एका वर्षाने राधाला दुसरा मुलगा, रोहित झाला. या मुलाला मात्र राधाने स्वतःकडेच ठेवलं. राधाचा डिप्लोमा आणखी एका वर्षाने पुरा झाला. एव्हाना गणेशला त्याच्या कंपनीने स्पॉन्सर केलं होतं. त्याला

इमिग्रंट व्हिसा मिळण्याची तो वाट पाहत होता. राधा भारतात जाऊन समीरला एकदा भेटून आली होती, पण तिला त्याची सारखी आठवण यायची.

आणखी दोन वर्षे गेली. गणेश नोकरीत स्थिरस्थावर झाला होता. त्याने घरही घेतलं होतं. समीर एव्हाना सहा वर्षांचा झाला होता. आता मात्र राधाला राहवेना. गणेशला परत भारताला जायचं नाही हे तिला कळून चुकलं होतं. समीर आपल्याला कायमचा मुकेल ह्या भीतीनं तिनं 'समीरला इकडे आणू या' अशी भुणभुण गणेशच्या मागे लावली होती. शेवटी गणेशने भारतात आपल्या आईवडलांना पत्र लिहिलं. त्यांनी समीरला त्याच्या आजीबरोबर अमेरिकेला पाठवायचं ठरवलं.

सहा वर्षांचा समीर आजीबरोबर घाबरल्या सशासारखा अमेरिकेत आला. भाषा, शाळा सगळंच वेगळं. शिवाय त्याला आजोळच्या आणि आपल्या माणसांनी भरलेल्या प्रचंड घराची आणि सभोवतालच्या मोठ्या शेतांची सवय होती. तिकडे तो इतर मुलांबरोबर मोकाट सुटलेला असे. अमेरिकेत त्याला कोंडल्यासारखं झालं. सुरवातीला तो 'परत जाऊ या' म्हणून रोज रडायचा. त्याला म्हशी, बैल, विहीरी, शेतं असणारं घर हवं होतं. त्याचबरोबर राधाही रडायची. तिलाही तेच हवं होतं.

हळूहळू समीर अमेरिकेला सरावला. मधूनमधून तो हरवल्यासारखा बसून राहायचा. त्याच्याकडे पाहून राधाची मनाची धालमेल व्हायची . 'हे रोपटं इथे रुजेल का' ह्याची तिला काळजी वाटायची.

ह्याच सुमाराला गणेश व राधाचे घरावरून वाद सुरु झाले. सुरुवातीला राधा अमेरिकेला आली तेव्हा अमेरिकेतील आधुनिक घरं, तऱ्हेतऱ्हेचे वॉल पेपर्स, घरात घेतलेली कारपेट्स, वेगवेगळ्या पद्धतीचं व डिझाइनचं फर्निचर ह्या सगळ्याचं राधालाही फार आकर्षण होतं. त्या दोघांनीही पैसे काळजीपूर्वक वाचवून अनेक वस्तू विकत घेतल्या होत्या.

पण जसे दिवस जाऊ लागले, तसे राधाला ह्या वस्तू व घर म्हणजे बोजा व वेळखाऊ वाटू लागल्या. घर व्हॅक्यूम करण्यात, मुलांची अनेक खेळणी व इतर सामान आवरण्यात आपलं आयुष्य व्यर्थ चाललंय, ही जाणीव तिला होऊ लागली. तिचं ह्या वस्तूंचं आकर्षण संपलं होतं. राहून राहून तिला आपल्या घरची आठवण येत होती. बाजेच्या खाटल्या, वळकट्या, एक ठेवणीतले कपडे ठेवायची संदूक व बसायच्या खोलीतली गादी, तक्क्या व स्वैंपाकघरातील भांडी, डबे एवढंच सामान त्यांच्या सुखवस्तू घरात होतं. वापरायचे कपडे व एक चप्पल जोड या पलीकडे कपडे घ्यायची पद्धतही नव्हती. लहानपणी खेळण्याचा पण तिला कधी तुटवडा जाणवला नव्हता. सागरगोटे, दगड, पानं, काचेचे तुकडे, फुलं, माती मिळेल त्याच्याशी ती खेळत असे.

गणेशमध्ये मात्र तिच्यासारखा बदल झाला नव्हता. त्याचं वस्तूंचं आकर्षण किंवा प्रेमच म्हणा, होतं तसंच होतं. शिवाय एवढ्या कष्टाने पैसे साठवून घेतलेल्या घराकडे, फर्निचरकडे राधा दुर्लक्ष करते, हे त्याला आवडायचं नाही. तो 'घर नीट ठेव. वस्तू व्यवस्थित ठेव.' म्हणून राधाच्या मागे किटकिट करत राहायचा. मग राधाची आणि त्याची भांडणं व्हायची.

फक्त दर स्प्रिंग व उन्हाळ्यात राधा जीव लावून घराभोवतालच्या बगीच्याची आणि घरामागच्या भाज्यांची निगा राखत असे. तिच्या बगीच्याची सर रस्त्यावरच्या दुसऱ्या कुठल्याही बगीच्याला नव्हती आणि गणेशला तिचा बागीच्याच्या बाबतीत अभिमान वाटायचा. जसा समीर मोठा होऊ लागला तसा तोही बगीच्यात झटून काम करू लागला.

एकदा गावातल्या हौशी मंडळींनी घरासाभोवतालच्या सुंदर बगीच्यांची चढाओढ ठेवली. त्यात राधाला पाहिलं बक्षिस मिळालं. मग राधा अनेक ठिकाणी उत्तम प्रकारचे टोमॅटो, भोपळे, इतर भाज्या यांसाठी होणाऱ्या चढाओढीत भाग घेऊ लागली. समीरही त्या चढाओढीत भाग घेण्यासाठी लागणारी मदत हौसेने करू लागला.

मधून मधून राधा मुलांसह भारतात जाऊन यायची. जाताना भारतातील नातेवाईकांसाठी ती अमेरिकेतील वस्तू भेटी म्हणून नेत असे. पुष्कळदा नातेवाइकच तिला काय आणायचं ते लिहीत असत. भारताची विशेषतः भारतातील शेतीवाडीची व आपल्या घराची राधेची पूर्वीची ओढ कायम होती. पण पुष्कळदा तिथे गेल्यावर तिला जाणवायचं की आपल्याला ज्या भारताची ओढ लागते तो हा भारत नव्हे. कारण भारत बदलला होता. काही बदल प्रगतिशील म्हणण्याजागे होते, तर काही राधाला पसंत नव्हते.

खेड्यापाड्यातून वीज आली होती. पूर्वीची शेतीची जुनी पद्धत बदलून आता कमी अधिक प्रमाणात सर्वच शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करण्यास सुरुवात केली होती. पूर्वीपेक्षा वेगळी पिंकही काढली जात होती. ऊस व तंबाखू ह्या पैसे जास्त मिळवून देणाऱ्या पिकांचं बरेच शेतकरी उत्पादन करत होते. गाई, म्हशी पण वेगळ्या जातीच्या, जास्त दुध देणाऱ्या पाळल्या जात होत्या. घरात शेगड्या, कोळसे जाऊन स्टोव्ह आले होते, तर काही घरात गॅसही आला होता. ह्या झाल्या सुधारणा.

थोड्या प्रमाणात हिंदी व मराठी सिनेमामुळे आधुनिकतेचं चांगलं - वाईट लोणही आता बऱ्याच खेड्यात पोहोचलं होतं. मुली - सुना पाच वारी साड्या नेसू लागल्या होत्या. पिना, पावडर, मेकअप वगैरे सामान बऱ्याच घरात दिसू लागलं होतं. कोच, खुर्च्या इतर फर्निचर, रेडीओ तर सर्रास सगळीकडेच आले होते. कल्हईची पितळेची भांडी जाऊन स्टेनलेस भांडी आली होती.

आणखी एक बदल झाला होता. पाश्र्चात्य वस्तूचं सर्वांनाच विलक्षण आकर्षण निर्माण झालं होतं. राधा भारताला येणार असं कळलं रे कळलं की, भारतातील सासरचे व माहेरचे लोक वस्तूंची यादी तिला पाठवत असत. राधाला स्वतःला बाजारात जाण्याचा विलक्षण कंटाळा येत असला, तरी ती कर्तव्य बुद्धीने बाजारात जाऊन सर्व वस्तू विकत आणत असे. भारतात गेल्यावर तिच्या बॅगांचा तिच्या माहेरची व सासरची माणसं ताबा घेत. जादुगाराच्या पोतडीतून वस्तू निघाव्यात तशा वस्तू बाहेर निघत. खेळणी, घड्याळ, सेंट्स, साड्या, स्वेटर्स, छत्र्या, मिक्सर, ब्लेंडर इ.इ आणलेलं सर्व सामान एका हातातून दुसऱ्या हातात जात कौतुकाने बघितलं जाई. शेजारीपाजारी पण येऊन वस्तू बघून जात.

ह्या सर्वात भाग न घेणारी दोनच माणसं होती. एक स्वतः राधा व दुसरे तिचे सासरे.

तिचे सासरे अजून पूर्वीसारखेच कणखर होते. त्यांनी शेतीत सुधारणा केल्या होत्या, पण काळाने आणलेल्या इतर बदलांविषयी ते पूर्णपणे उदास होते.

समीर पंधरा वर्षांचा झाल्यावर राधा भारताला गेली होती, तेव्हा प्रथमच सासऱ्यांनी 'शेतीच्या भविष्याविषयी काळजी वाटते' असं आगदी मोघम शब्दात बोलून दाखवलं होतं. राधाला त्यांच्या काळजीचं कारण स्पष्टच दिसत होतं.

घरातील सर्व मुलं व मुली शहरात शिक्षणाला चालली होती. पुण्याला आता तिच्या सासरचं बिऱ्हाडच होतं व ही नवी पिढी परत खेड्यात जायचं नाही, असं आपापसांत कुजबुजत होती. त्यातल्या दोघा पुतण्यांना तर काकासारखं अमेरिकेला जायचं होतं.

अजून गणेशचे दोन्ही भाऊ शेती चालवायला समर्थ होते, पण पुढे काय हा प्रश्न म्हाताऱ्या सासार्यांपुढे आ वासून उभा होता.

आणखी काही वर्षे गेली. तेवीस वर्षांचा समीर शेतकी कॉलेजातून पास झाला आणि राधा त्याला व रोहितला घेऊन भारत भेटीसाठी परत गेली. तेव्हा तिचे कणखर सासरे आता अगदी म्हातारे झाले होते. सासू वारली होती. गणेशचा मोठा भाऊ रंगा आता साठच्या आसपास पोचला होता. एका अपघातात त्यांचा एक पाय अधू झाला होता. त्याला पूर्वीसारखं काम करणं जमत नव्हतं. धाकटा जानुच सगळं सांभाळत होता.

नव्या पिढीचा घराशी आता सुट्ट्यापुरता संबंध राहिला होता. जनू व रंगाच्या चार मुलांपैकी परत यायला कुणीही तयार नव्हतं. जनू पण 'हे ओझं मी एकटा किती दिवस सांभाळू ?' असं म्हणत होता.

म्हातारे सासरे एक दिवस राधाला म्हणाले, 'राधा, आता तुझी ही या घराला शेवटचीच भेट म्हणायची. मी लवकरच सगळं विकून टाकणार आहे.'

राधाचे डोळे भरून आले. 'माझ्या जिवाला हे शेत विकायचं याच्या इतक्या यातना होतायत, तर मामंजीना काय वाटत असेल.' ती मनात म्हणाली.

'मामंजी, मला शक्य असतं तर मी येऊन इथे राहून चालवली असती ही शेतीवाडी.' राधा सासर्यांना म्हणाली.

'तू तुझ्या नवऱ्याजवळ राहायचं, राधा.' 'मामंजी उत्तरले.

'हे सगळं मी जिवंत असताना विकून टाकणार आहे. ही जमीन कुणी प्रेमाने कसावी अशी माझी इच्छा आहे.'

जवळच बसलेला समीर उठून उभा राहिला व विचारू लागला, 'आजोबा, मी चालवू का ही शेतीवाडी ?'

आजोबा चमकले, 'अरे, समीर म्हाताऱ्या आजोबांची थट्टा करतोस का ? बाकी सगळे अमेरिकेला जायचं म्हणून तडफडत आहेत आणि तू इथे राहणार म्हणतोस ?' आजोबांचा समीरवर विश्वास बसला नाही, राधा पण समीरकडे पहात होती.

'खरच म्हणतोय का तू समीर ?'

तिने श्वास रोखून समीरला विचारलं. 'मम्मी, अगदी खरंच म्हणतोय. मी सहा वर्षांचा असताना मला आजीने अमेरिकेला नेलं. मी दोन्हीकडचा आहे, मम्मी, दोन्ही देशांचा. कदाचित पुन्हा पुन्हा इथे येत राहिलो तुझ्याबरोबर म्हणून असेल.'

'मला जन्मभर शेतीच करायची आहे. अमेरिकेतही मी शेतीच्या मागे लागणार होतो. त्याऐवजी इथे करीन. मागेच विचारणार होतो आजोबांना, पण मला वाटलं डॅडी या कुटुंबातून व शेतीपासून सुरवातीपासूनच दूर असल्याने मला अनुवशिक हक्क नाहीये ह्या शेतीवर, पण दुसऱ्या कुणालाच ती करायची नसेल तर व आजोबांची मला परवानगी द्यायची इच्छा असेल, तर इथेच राहतो मी.'

राधा आणि राधाचे सासरे निःशब्दपाणे समीरकडे बघत राहिले. दोघांनीही समीरचं बोलणं ऐकलं होतं, पण त्यांना ते समजायला वेळ लागला.

सासरे स्वगत बोलल्यासारखे पुटपुटले, 'बरोबर आहे. माती सगळीकडे सारखी. एकाच देवाने निर्माण केलेली. अमेरिका काय आणि भारत काय एकच !' त्यांचे डोळे पाणावल्यासारखे झाले होते. हळूहळू ते समीरकडे

वळले व विचारू लागले, 'हे बघ समीर, तुला अमेरिकेतल्या चैनीच्या वस्तू, तिथली राहणी ह्याचा सगळ्यांसारखा मोह कसा नाही ?'

'तो मोह मला कधीच नव्हता, आजोबा' समीरने उत्तर दिलं.

'विश्वास नाही बसत माझा.' आजोबा उद्गारले.

'तू माझ्या समाधानासाठी स्वार्थत्याग तर करत नाहीस ना ?'

'मुळीच नाही' समीर म्हणाला, 'तुम्हाला कसं पटवून देऊ मी ? खरं सांगतोय हे.'

'मामंजी, समीर खरं सांगतोय.' राधा हळूच म्हणाली.

'अमेरिकेचं, तिथल्या वस्तूंचं आकर्षण त्या मिळेपर्यंत असतं. एकदा त्या मिळाल्या की, बरोबर येणारे काटेही टोचू लागतात. ह्या वस्तूंमुळे माझा व समीरच्या वडीलांचा कितीदा तर वाद झालाय ! हे आकर्षण एकदा सगळं मिळाल्यावर हळूहळू नाहीसं होतं. काही माणसांच्या मनातून, निदान माझ्या मनातून तरी झालंय. मला भौतिकतेचा अगदी कंटाळा आलाय, पूर्वीचं साध जीवन बरं होतं असं वाटतंय, समीर तर सहा वर्षांपासून अमेरिकेला राहिलाय, तो माझ्यासारखाच आहे. त्यालाही माझ्यासारखीच वस्तूंचे गुलाम होऊन राहायची इच्छा उरलेली नाही, यात मला आश्चर्य वाटत नाही. शिवाय…'

राधा क्षणभर थांबली,'अगदी लहानपणापासूनच तो बागकाम करायचा. शेतकी कॉलेजात स्वतःहून गेला, मामंजी, तुमच्यासारखं त्याच्याही रक्तात मातीचंच प्रेम वाहतंय.'

माझ्यासारखं आणि त्याच्या आईसारखंही सुनबाई.' सासरे बोलवत नसताना म्हणाले.

'मग मी लिहू का पत्र डॅडींना, मी इथेच राहतो म्हणून ?' समीर उतावळेपणाने उभं राहून म्हणाला.

त्याच्या आजोबांना बोलता येईना म्हणून त्यांनी उत्तर देण्याऐवजी मान डोलावली. समीरच्या आयुष्याचं चक्र पूर्ण वर्तुळातून फिरून परत उगमस्थानी येउन पोहोचलं होतं.

समाप्त

पूर्व प्रसिद्धी, पक्षी जाय देशांतरा, उत्कर्ष प्रकाशन

ही कथा १९७० - १९८० सालात घडते